**महाराष्ट्र शासन**

क्र. एनजीसी ३५९९/नमवि/(१/९९)/मशि ३,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ९ जुलै, १९९९.

प्रति,
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर.

विषय : **सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षापासून नवीन**
**महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी देणेबाबत.....**

महोदय,

सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविद्यालये सुरु करण्यासंदर्भात विद्यापीठांकडून शासनास प्राप्त झालेल्या प्रस्तावांचा विचार करुन सोबत जोडलेल्या यादीतील विद्यापीठाने नकारात्मक शिफारस केलेल्या शैक्षणिक संस्थांना स्थानिक परिसरातील उच्च शिक्षणाची गरज व सक्षम संस्था या बाबी विचारात घेऊन महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ च्या कलम ८२ (५) च्या परंतुकानुसार संबंधित संस्थांसमोर दर्शविलेल्या ठिकाणी व दर्शविलेल्या विद्याशाखेने नवीन महाविद्यालय सुरु करण्यास सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षापासून पुढील अटींच्या अधिन राहून शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

१) सदर महाविद्यालयांना देण्यात आलेली परवानगी सध्या विना अनुदान तत्वावर असून, शासन निर्णय क्रमांक एनजीसी २०९१/(३५६७)/विशि-२अ, दिनांक ८.८.१९९१ अन्वये लागू करण्यात आलेल्या अनुदान सूत्रानुसार व वेळोवेळी निर्गमित करण्यात येणा-या अनुदान संदर्भातील शासन निर्णयाच्या अटींच्या अधिन राहून या महाविद्यालयांना अनुदान तत्वावर आणण्याचा यथावकाश विचार करण्यात येईल.

२) महाविद्यालयांना ज्या विद्याशाखा सुरु करण्याची परवानगी देण्यात आलेली आहे, त्या प्रत्येक विद्याशाखेच्या त्रिवर्षीय पदवी परीक्षेच्या पहिल्या वर्षाच्या वर्गात खाली दर्शविल्याप्रमाणे विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला तरच वर्ग सन १९९९-२००० पासून सुरु करावा.

| | | | |
|---|---|---|---|
| अ) शहरी विभाग | ६० | ब) आदिवासी विभाग | ४० |
| क) ग्रामीण विभाग | ५० | ड) महिला महाविद्यालय | ५० |

**(कृपया मागे पहा.)**

Inward No- २०४/ak/९९-२००० 
Date- २२/७/१९९९

तसेच, सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षाच्या शेवटी होणा-या प्रथम वर्षाच्या विद्यापीठ परीक्षेत कमीत कमी खालीलप्रमाणे विद्यार्थी बसणे आवश्यक आहे :-

| | |
|---|---|
| अ) शहरी विभाग | ५० |
| ब) आदिवासी विभाग | ३० |
| क) ग्रामीण विभाग | ४० |
| ड) महिला महाविद्यालय | ४० |

१) शासनाने ज्या विद्याशाखांना परवानगी दिलेली आहे त्या विद्याशाखांतर्गत संस्थांनी मूळ प्रस्तावात ज्या विषयांची मागणी केली आहे, तेच विषय सुरु करणे संस्थेवर बंधनकारक राहील. त्याव्यतिरिक्त विषय सुरु केल्यास सदर विषय अनुदानास पात्र समजण्यात येणार नाही.

२. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ च्या कलम ८३ मधील तरतुदीनुसार संलग्नीकरण करण्याबाबत योग्य ती कार्यवाही विद्यापीठाने तात्काळ करावी व पूर्तता अहवाल संचालक (उ.शि.) महाराष्ट्र राज्य, पुणे यांना अग्रेषित करावा.

३. विद्यापीठाने शासनास सादर केलेल्या प्रस्तावांपैकी ज्या-ज्या संस्थांच्या प्रस्तावांना शासनाने मंजूरी प्रदान केलेली नाही, अशा सर्व संबंधित संस्थांना त्या संस्थांचा प्रस्ताव शासनाने नामंजूर केला असल्याचे विद्यापीठ स्तरावरुन परस्पर कळविण्यात यावे.

आपला विश्वासू,

(म. अं. सरपोतदार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

True Copy
PRINCIPAL
Prof. Sambhajirao Kadam College
Deur (Satara)

प्रत -

शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर
अध्यक्ष/सचिव, सर्व संबंधित संस्था.
खाजगी सचिव, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
खाजगी सचिव, मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
खाजगी सचिव, (मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण)
खाजगी सचिव, (राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण)
स्वीय सहाय्यक (प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण)
निवड नस्ती मशि-३.

8

शासन पत्र क्रमांक एनजीसी ३५९९/नमवि/(१/९९)/मशि-३, दिनांक ९ जुलै, १९९९ अन्वये सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविद्यालये सुरु करण्यास परवानगी दिलेल्या संस्थांची यादी.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

| अ.क्र. | संस्थेचे नांव | ठिकाण | विद्याशाखा |
|---|---|---|---|
| १ | श्री. मुधाईदेवी शिक्षण संस्था, देऊर | देऊर, ता. कोरेगांव, जि. सातारा | कला |
| २ | श्री. शाहू शिक्षण प्रसारक सेवा मंडळ, पेठ वडगांव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | पेठ वडगांव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | कला व विज्ञान |

True Copy

P...
Prof. Samb... College,
Deu... (Satara)